(1)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** भंडारा **P.S.(ठाणे):** भंडारा **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0792 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/12/2019 16:12 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 13/12/2019
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/12/2019
**Time From (वेळेपासून):** 10:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 10:07 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 13/12/2019 **Time (वेळ):** 15:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 052 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/12/2019 15:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 2 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भंडारा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** कमलकिषोर दयानंद पशीने

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1952 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

# <u>फिर्याद</u>

दिनांकः—१३/१२/२०१९.

मी कमलकिशोर दयानंद पशीने, वय ६७ वर्ष, धंदा— सिक्युरीटी गार्ड, मु+पो. हरदोली ता. मोहाडी जि. भंडारा.

मी दिनांक १२/१२/२०१९ रोजी पोलीस निरीक्षक श्री. पुरूषोत्तम अहेरकर, ला. प्र. वि. भंडारा यांचे समक्ष एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबधाने तोंडी तक्रार नोंदविली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

"मी, स्वतः लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे हजर येवुन तक्रार देतो की, मी वरील नमुद पत्यावर परीवारासह राहतो आणि साक्षी ईजिनीअरींग वर्क शॉप बुट्टीबोरी येथे सन २०११ पुासन खाजगी कंपनीत सिक्युरीटी गार्ड चे काम करीत आहे. मी अंदाजे ४० वर्षापासुन हार्मोनियम वादक, भजनकार, गायक, नाटक कलाकार म्हणुन स्थानीक पातळीवर मनोरंजनाचे काम करीत असुन लोककलाकार असुन सध्या वयोवृध्द आहे.

सन २०१७—१८ मध्ये मला माहीती मिळाली की, शासनाकडुन वृध्द कालाकारांना मानधन योजने अंतर्गत मानधन मिळते. या माहीती वरून मी सन २०१७—१८ मध्ये पंचायत समिती मोहाडी येथे सर्व सबंधीत कागदपत्रांसह या योजनेचा लाभ मिळण्याकरीता अर्ज केला होता. यावरून माहे फेब्रुवारी/२०१९ मध्ये मला अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परीषद भंडारा यांचे दिनांक ०१/०३/२०१९ रोजी सकाळी ०८.०० वा. कलेच्या तपासणी कार्यक्रमा करीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह सामाजिक न्याय भवन भंडारा येथे हजर राहण्याचे पत्र मिळाले. त्याअनुशंगाने दि. ०१/०३/२०१९ रोजी मी दिलेल्या ठिकाणी सदर तपासणी/मुलाखत करीता त्यामध्ये दिलेल्या वेळेत हजर राहुन समाज कल्याण विभाग जिल्हा परीषद भंडारा येथील अधिका—यांच्या कमिटी समोर मुलाखत देवून माझी कला सादर केली. मुलाखत संपल्यानंतर त्याच ठिकाणी जिल्हा परीषद भंडारा समाज कल्याण विभागात कार्यरत असलेले श्री. पशीने बाबु भेटले, व त्यांनी मला माझ्या नातेवाईकांच्या गावात त्यांचे नातेवाईक राहतात वगैरे माहिती सांगुन ओळख काढली व या मुलाखती करीता बरेच कालाकार आले आहेत. तुमची जर या योजने करीता निवड करायची असेल तर मी मुलाखत घेणा—या कमिटी कडुन तुमचे मार्क वाढवुन तुमची निवड करू देतो त्याबदल्यात तुम्हाला माझ्या करीता खर्च करावा लागेल असे म्हणाले, त्यावर मी माझी कला चांगली आहे. तुम्ही मदत करत असाल तर करा? असे त्यांना म्हणालो त्यावर त्यांनी त्यांचे मोबाईल नंबर ९८३४७४९०७० आणि ८७९३४८९६१५ मला दिले व माझे मो.न. ७७९८५३८६८७ आणि ९३०७४८१३८७ त्यांनी घेतले. आणि तुम्हाला फोन करून तुमच्या कामा बद्दल सांगतो असे म्हणाले.

त्यानंतर या योजने करीता वृध्द कालाकारांच्या निवडीच्या अंतीम यादी मध्ये तुमचे नाव आहे मी तुमचे काम केले असे पशीने बाबुंनी मला फोन करून मुलाखती नंतर एक ते दोन महिण्यानंतर सांगीतले होते. परंतु त्यांनतर काही दिवसांनी अंतीम यादी निघाली त्यामध्ये माझे नाव नव्हते, त्यामुळे मी पशीने बाबुंना माझी निवड न झाल्याने त्यांचे कार्यालयात पाच ते सहा महिण्यापुर्वी भेटलो. तेव्हा त्यांनी दुस—या यादीमध्ये मी समिती वाल्याकडुन तुमचे नाव टाकुण घेतो. असे सांगीतले त्यानंतर मागी चार ते पाच महिण्यात समाज कल्याण विभाग जिल्हा परीषद भंडारा येथे मी माझ्या निवडी करीता माझे कमी असलेले कागदपत्र दिले. त्यानंतर अंदाजे १५ दिवसांपुर्वी वृध्द कलाकार मानधन योजने अंतर्गत निवड झालेल्या कालाकारांच्या निघालेल्या यादीत अ.क्रं. ५ वर माझे नाव आहे व माझी निवड झाली आहे.

[signature] 13.12.019

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हरदोली,मोहाडी,भंडारा,भंडारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हरदोली,मोहाडी,भंडारा,भंडारा,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अभय मोतीराम पषिने | | | 1. हरदोली,मोहाडी,भंडारा,भंडारा,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिति देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5000 | 5,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 5,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

प्रकरण अषा प्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी आपले लोकसेवक पदाचा गैरफायदा घेवुन स्वतः चे आर्थिक लाभा करीता यातील फिर्यादी यांना त्यांनी माहे फेब्रुवारी/2019 मध्ये त्यांना अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परीषद भंडारा यांचे तपासणी/मुलाखतीमध्ये शासनाकडुन वृध्द कालाकारांना मानधन योजने अंतर्गत, वृध्द कालाकारांच्या निवडीच्या समाज कल्याण विभाग जिल्हा परीषद भंडारा येथील अधिका-यांच्या कमिटी समोर मुलाखत देवून त्यांची कला सादर केली. त्या योजनेकरीता निवड समितीवर प्रभाव टाकुण, त्यांची त्यावर निवड करून दिल्याचा मोबदला म्हणुन मला 5000/- रूपये लाचेची मागणी करून प्रत्यक्ष सापळा कार्यवाही दरम्यान पंचसाक्षीदारासमक्ष कोणत्याही प्रकारचा प्रतिकार न करता लाच रक्कम स्विकारल्याने सदचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** sudhakar kaluram chavhan(I (Inspector)) / **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

मागील आठवडयात माझा मोबाईल कं. ९३०७४८१३८७ वर पशीने बाबु यांचे मोबाईल कं. ९८३४७४९०७० वरून मला फोन आला व त्यांनी मला मी तुमचे वुध्द कलाकारांच्या मानधन योजनेत निवड करण्याचे समिती कडुन काम करून दिले त्याचा मोबदला म्हणुन तुम्ही मला अजुन काहीच दिले नाही. तुम्हाला पैसे दयावे लागतील त्यावर मी त्यांना किती पैसे दयावे लागतील असे विचारले तर त्यांनी मी दुस–यांकडुन जास्त पैसे घेतो. परंतु तुम्ही आपले सबंधी आहात त्यामुळे ५,०००/– रूपये दया! तुम्ही पैसे घेवुन येता किंवा नाही असे म्हणाले तेव्हा मी बुट्टीबोरी येथे आहे. १० डिसेंबर ला भंडारा येथे आल्यानंतर तुम्हाला भेटतो असे सांगीतले, त्यावर पशीने बाबुंनी भेटायला येण्यापुर्वी मला फोन करा असे सांगीतले. त्यांची समाज कल्याण विभाग जिल्हा परीषद भंडारा येथुन बदली झाली असुन ते सध्या दुस–या कोणत्यातरी ऑफिस मध्ये भंडारा येथे नोकरीला आहेत.

मी वयोवृध्द व कलावंत असल्याने माझ्या गुणांमुळे माझी निवड झाली परंतु हि निवड, निवड समिती कडुन मी करून दिली असे पशीने बाबु आधी कार्यरत समाज कल्याण विभाग जिल्हा परीषद भंडारा हे म्हनुण त्याबदल्यात मला ५,०००/– रूपये लाच मागत आहेत. माझी लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी त्याचे विरूध्द तक्रार देत आहे.

माझे पशीने बाबु यांच्याशी पुर्वीचे कोणतेही आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही. तरी त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. ती मी वाचुण बघितली, माझे सांगणेप्रमाणे बरोबर असल्याची खात्री करून त्यावर सही केली.

वरिल तक्रार दिल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. अहेरकर, साहेब यांनी लाचेच्या संबंधाने पडताळणी व सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी दोन शासकीय पंचाना ला. प्र. वि. च्या कार्यालयामध्ये कार्यवाही कामी बोलावून घेतले. त्यांचे समक्ष मी दिलेली तोंडी तक्रार पंचाना वाचण्याकरीता दिली व पंचानी वाचुण व मला विचारपुस करून खात्री केली व तक्रारवर त्यांनी सहया केल्या. पंचासमक्ष मला आणि पंचाना तक्रारीची पडताळणी करण्याकरीता सुचना दिल्या. त्यानंतर दिनांक १२/१२/१९ रोजीच पडताळणी कार्यवाही दरम्यान, श्री. पशीने बाबु यांनी मला 'मी माहे फेब्रुवारी/२०१९ मध्ये मला अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परीषद भंडारा यांचे <u>तपासणी/मुलाखतीमध्ये</u> शासनाकडुन वृध्द कालाकारांना मानधन योजने अंतर्गत, वृध्द कालाकारांच्या निवडीच्या समाज कल्याण विभाग जिल्हा परीषद भंडारा येथील अधिका–यांच्या कमिटी समोर मुलाखत देवून माझी कला सादर केली. त्या योजनेकरीता निवड समितीवर प्रभाव टाकुण, माझी त्यावर निवड करून दिल्याचा मोबदला म्हणुन मला ५०००/– रूपये लाचेची मागणी करून, ५०००/– रूपये लाच रक्कम दुस–या दिवशी सकाळी भंडारा येथे स्विकारण्याची तयारी दर्शविली. मी पंचासह परत आल्यावर श्री. अहेरकर, साहेब यांनी मला व पंचास विचारून व व्हाईस रेकॉर्डर मधिल संरक्षित संभाषन ऐकुण लाचेची मागणी झाली असल्याची शहानिशा केली. त्याबाबत अहेरकर साहेब यांनी सविस्तर पंचनामा तयार केला.

त्यांनतर दिनांक १२/१२/१९ रोजीच मी ज्यात ५००/– रू. च्या १० नोटा असे ५०००/– रूपये सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. अहेरकर साहेब आणि दोन्ही पंचासमक्ष पेश केले. त्यांनी त्याचेवर पावडर लावून त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्याबाबत अहेरकर साहेब यांनी सविस्तर पंचनामा तयार केला.

दिनांक १३/१२/२०१९ रोजी सापळा अधीकारी पोलीस निरीक्षक, श्री. अहेरकर यांनी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा कार्यालयातुन सापळा कारवाई आयोजीत करण्यापुर्वी पशिने यांनी सांगितल्याप्रमाणे मी माझ्या मोबाईलवरून पशिने बाबु यांच्या मोबाईलवर फोन लावला असता त्यांनी मला थोड्यावेळात राजीव गांधी चौकातील बॅंक ऑफ ईंडिया जवळ येण्यास

13.12.019[2]

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): sudhakar kaluram chavhan
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

भनापोशि दिपक चलुराम जाधव
ब.नं. १०२५
पो.स्टे. भंडारा

सांगितले. नंतर सापळा अधिकारी श्री. अहेरकर साहेब यांनी सापळा कार्यवाही आयोजित करत असतांना पावडर लावलेले ५०००/— रूपये ज्यात ५००/— रूपयाच्या दहा नोटांचा समक्ष त्या माझ्या फुल पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात पंच क्र. १ श्री. घरडे यांचे हस्ते ठेवुन, सापळा अधिकारी यांनी पंच श्री. घरडे यांना त्यांचे दोन्ही हात स्वच्छ धुण्यास लावले, त्यांनतर त्यांचे दोन्ही हाताचे बोटे तपासुन, त्यावर निळसर रंगाची चकाकी नसल्याची खात्री करून घेतली. त्यांनतर व्हॉईस रेकॉर्डर माझे गळयात लटकवुन पंच क्र. १ श्री. घरडे यांच्यासह श्री. पशिने बाबु यांनी सांगितलेप्रमाणे राजीव गांधी चौकातील बॅक ऑफ ईंडिया जवळ पाठविले. पंच व मी तेथे पोहोचलो, त्यापाठोपाठ सापळा अधिकारी श्री. अहेरकर साहेब व त्यांचे सोबत पंच क्र. २ आणि सोबतचे कर्मचारी सुध्दा तेथे येऊन आजुबाजुला दुकानाजवळ काही अंतरावर थांबले होते. तिथे पशिने बाबु काही वेळाने एका ईसमासोबत दुचाकी वाहनाने हजर आले. त्यांनी मला मागणी केलेली लाचची रक्कम ५०००/— रूपये बॅक ऑफ ईंडिया जवळील प्रगती फार्मा च्या दवाईच्या दुकानजवळ स्विकारली, ती मोजुन त्यांनी घातलेल्या शर्टचे वरिल डाव्या बाजुच्या खिशात ठेवली. हे सर्व बाजुलाच असलेले सापळा अधिकारी श्री. अहेरकर साहेब व त्यांचे कर्मचारी सुध्दा बघत होते. तरीपण मी ठरल्याप्रमाणे ईशारा दिल्यावर अहेरकर साहेब व पंच क्र. २ आणि त्यांचे सोबतच कर्मचारी तेथे आले.

श्री. अहेरकर साहेब यांनी पंच क्र. १ श्री. घरडे यांचे मदतीने श्री. पशिने बाबु यांना ओळखुन त्यांनी लाच रक्कम स्विकारून ती त्यांच्या शर्टाच्या वरिल डावे बाजुच्या खिशात ठेवली होती. त्यामुळे श्री. पशिने बाबु यांना ताब्यात घेऊन प्रगती फार्माच्या दुकानाच्या आत घेऊन गेले. तेथे श्री. पशिने बाबु यांच्या शर्टाच्या वरिल डावे बाजुच्या खिशात ठेवुन असलेली लाच रक्कम दोन्ही पंचासमक्ष ताब्यात घेऊन त्यावर चमकनारी पावडर दिसत असल्याची शहानिशा निळया लाईटचा उजेड टाकुन केली व त्यानंतर ती लाच रक्कम पंचासमक्ष ला.प्र.वि. भंडारा या कार्यालयात जावुन जप्त करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर सापळा अधिकारी श्री. अहेरकर साहेबांनी प्रगती फार्माच्या दुकानात सविस्तर कार्यवाही केली व नंतर गै.अ. श्री. पशिने बाबु यांना सोबत घेवुन अॅन्टी करप्शन ब्युरो, भंडारा कार्यालयात आले. अॅन्टी करप्शन ब्युरो, भंडारा येथे गै.अ. पशिने बाबु यांनी स्विकारलेली लाच रक्कम दोन्ही पंचासमक्ष जप्त केली. त्यांनतर गै.अ. श्री. पशिने बाबु यांचे अंगातील शर्ट दोन्ही पंचासमक्ष श्री. अहेरकर साहेब यांनी पशिने बाबु यांचे कडुन जप्त केले.

श्री. पशिने, कनिष्ठ लिपीक, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय भंडारा यांनी ''मी माहे फेब्रुवारी/२०१९ मध्ये मला अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परीषद भंडारा यांचे तपासणी/मुलाखतीमध्ये शासनाकडुन वृध्द कालाकारांना मानधन योजने अंतर्गत, वृध्द कालाकारांच्या निवडीच्या समाज कल्याण विभाग जिल्हा परीषद भंडारा येथील अधिका—यांच्या कमिटी समोर मुलाखत देवून माझी कला सादर केली. त्या योजनेकरीता निवड समितीवर प्रभाव टाकुण, माझी निवड करून दिल्याचा मोबदला म्हणुन मला ५०००/— रूपये लाचेची मागणी करून आज रोजी बॅक ऑफ ईंडिया च्या बाजुला लागुण असलेल्या प्रगती फॉर्मा दवाईच्या दुकाना समोरील रोडवर भंडारा येथे लाच रक्कम ५०००/— स्विकारले आहे. श्री. पशिने, कनिष्ठ लिपीक, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय भंडारा यांनी मला लाचेची मागणी करून ती स्विकारल्याने कार्यवाहीस्तव फिर्याद देत आहे.

माझा वरील फिर्यादी बयान वाचुन पाहीला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

13.12.019

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**